## ❋ नाट्यसंस्कार कला अकादमी सन २०१३–१४ चा अहवाल ❋

या वर्षीची सुरूवात नाट्य कार्यशाळेनी झाली. यावर्षी पुण्यातील विविध भागात कार्यशाळा घेण्यात आल्या. पहिली कार्य शाळा – १५ ते ३० एप्रिल साने गुरूजी स्मारक, सिंहगड रोड इथे दोन्ही गटांसाठी कार्यशाळा घेण्यात आली. त्याच दरम्यान महेश बालभवन गणंजय सोसायटी कोथरूड येथे ही दोन्ही गटांसाठी कार्यशाळा घेण्यात आली. दोन्ही केंद्राचा ३० एप्रिल रोजी भरत नाटमंदीर येथे शिबीराचा समारोप करण्यात आला. कार्यशाळेची सुरूवात 'आईशप्पथ' या नाटकाने करण्यात आली. कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद होता.

दुसरी कार्यशाळा – २ मे ते १६ मे चार ठिकाणी घेण्यात आल्या.

१. प्रभात कार्यालय, नारायण पेठ, येथे फक्त मोठ्या गटासाठी

२. यशश्री बालक्रीडा मंडळ, यशश्री सोसा.कोथरूड येथे दोन्ही गटांसाठी कार्यशाळा घेण्यात आली.

३. श्री रविशंकर विद्यालय, म्हात्रे पुलाजवळ, छोट्या गटासाठी

४. अविष्कार बालभवन, श्रीधरनगर, चिंचवड येथे दोन्ही गटासाठी कार्यशाळा घेण्यात आली.

१५ मे राजी कार्यशाळेतल्या विद्यार्थ्यांनी भरत नाट्य मंदीर येथे नाटीका सादर केल्या.

दि.१६,१७,१८ मे रोजी यशवंतराव चव्हाण येथे बालनाट्य महोत्सव सादर करण्यात आला. पहिल्या दिवशी नाट्यपरिषदेचे अध्यक्ष डॉ.सतीश देसाई यांच्या हस्ते ब्रेललिपीतील नाट्यछटा पुस्तकांचे प्रकाशन झाले. प्रकाशनानंतर ''ढब्बू ढोल रिमोट गोल'' या बालनाट्याचा प्रयोग झाला.

❋ दि.२२, २३, २४ एप्रिल रोजी नाथ पै येथे बालनाट्य महोत्सव करण्यात आला.

❋ **१ जून** रोजी बालक पालक सभासद योजनेचा पहिला मेळावा नाथ पै येथे घेण्यात आला. त्यामध्ये ७ जून रोजी बालगंधर्व रंगमंदिरात ''आईशप्पथ'' या नाटकाचा प्रयोग दाखवण्यात आला.

❋ **जुलै महिन्यात** बालक पालकासाठी नाट्यछटा मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आल्या. मुलांनी पालकांनी त्यामध्ये उत्स्फुर्तपणे भाग घेतला.

❋ **ऑगस्ट महिन्यात** बालक पालक सभासद योजनेत नचिकेत खासनीस यांनी ''मागे पळून पाहतांना'' हा संगीत कार्यक्रम सादर केला. गणपती मूर्ती, आकाशकंदील याची कार्यशाळा घेण्यात आली. बालक पालक यांच्याकडून गणपती मूर्ती आणि आकाशकंदील करून घेण्यात आले या योजनेअंतर्गत दिवाळीच्या सुट्टीत नाट्यशिबिर घेण्यात आले. कामगार कल्याण केंद्राच्या बालनाट्य स्पर्धेत भाग घेतला आणि बक्षीस मिळविले. त्याचप्रमाणे पालकांनी महिला नाट्यस्पर्धेत भाग घेऊन नाटिका सादर केली. राज्य नाट्यस्पर्धेत धनंजय सरदेशपांडे लिखित ''क्लोन'' ही आगळी वेगळी नाटिका सादर केली. परीक्षकांनी तोंड भरून कौतुक केले. प्रभाकर भावे याचं मेकअप वरील व्याख्यान झाले. मोराची चिंचोली येथे सहल काढण्यात आली. सर्वांनी त्याचा आनंद लुटला.

''आईशप्पथ'' या नाटकाचा ४९ वा प्रयोग २५ डिसेंबर रोजी भीमसेन जोशी कलामंदिर, औंध येथे झाला. ५० वा. प्रयोग भरत नाट्य मंदीर येथे झाला. त्यावेळी अखिल भारतीय नाट्यपरिषदेचे अध्यक्ष श्री. सुरेश देशमुख यांच्या हस्ते

कलाकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सक्षम कुलकर्णी उपस्थित होता.

१ मार्च रोजी बालक–पालक सभासद योजनेचा मेळावा घेण्यात आला. त्यामध्ये प्रकाश पारखी यांनी सुट्टीतील उपक्रमांची माहिती दिली. १३ एप्रिल रोजी बालनाटय प्रयोगाने यावर्षीच्या सभासद योजनेची सांगता होणार आहे.

**१. विशेष :**

आपल्या संस्थेचे प्रमुख विश्वस्त प्रकाश पारखी हे १९ जून ते २९ ऑक्टोबर अमेरिकेत गेले होते. ऱ्होड आयलंड प्रांतातील प्रॉव्हीडन्स या शहरात १६ वे बृहन महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन झाले. त्यात प्रकाश पारखी यांनी मोठ्यांसाठी नकला नगरी व छोट्यांसाठी ''जादुचे घर'' हे कार्यक्रम केले. फिनीक्स मेट्रो महाराष्ट्र मंडळाच्या गणेशोत्सवातही कार्यक्रम सादर केला.

१९ ऑक्टोबर २०१३ रोजी लॉस एंजलीस महाराष्ट्र मंडळासाठी अखाईन व

२० ऑक्टोबर रोजी सिमीव्हॅली येथे नाट्य कार्यशाळा घेतली.

**२. विशेष :**

या वर्षी आपलया संस्थेच्या ३ बालनाट्यांचा दौरा बिड या गावी गेला होता तेथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात १) ढब्बू ढोल रिमोट गोल २) आई शप्पथ ३) इन मिन साडेतीन

या बालनाट्यांचे शनिवार. दि १७ ऑगस्ट व रविवार दि. १८ ऑगस्ट रोजी या बालनाट्यांचे एकुण ८ प्रयोग करण्यात आले व बिड मधील सुमारे दहा हजार प्रेक्षकांनी याचा आनंद घेतला.

८ व ९ फेब्रुवारी रोजी यावर्षीच्या भालबा केळकर स्मृती करंडक स्पर्धा झाल्या. या स्पर्धेचा बक्षीस समारंभ १६ फेब्रुवारी रोजी भरत नाट्य मंदिर येथे झाला. त्यावेळी अखिल भारतीय नाट्यपरिषदेचे अध्यक्ष श्री. सुरेश देशमुख यांच्या हस्ते १) अमोल जाधव २) दिपाली निरगुडकर ३) पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेतील लेखन, दिग्दर्शन, अभिनय प्रथम पुरस्कार विजेता शिवराज वायचळ या कलाकारांचा सत्कार करण्यात आला.